Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# नगर परिषद शाळा क्र. 07 मनमाड येथील अभ्यासपूरक तासिकांच्या वस्तुस्थितीचा चिकित्सक अभ्यास आणि उपाययोजना

संशोधकाचे नाव
श्री. विकास विलास तरटे
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
प्राचार्य मा. डॉ. दादासाहेब मोरे
*(एम.एस्सी.एम.एड.पी.एच.डी)*
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*

*सारांश*

*अभ्यासपूरक तासिकांच्या माध्यमातून उपक्रमांच्या अंमलबजावणीचा चिकित्सक अभ्यास करतांना त्यातील येणा–या समस्यांचा विचार करणे आवश्यक असते. जोपर्यंत अभ्यासपूरक तासिकांचे नियोजन व अंमलबजावणीतील अडचणी समारे येणार नाहीत तोपर्यंत उपक्रमांच्या गुणवत्तेत अडथळे निर्माण होतात. या अडचणी समजल्याच नाहीत तर यावर उपाय सुचविता येणार नाहीत. अभ्यासपूरक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण आणि सामाजिक विकास होण्यास मदत होते याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे आवश्यक आहे. पालकांच्या आपल्याकडून वाढलेल्या अपेक्षा ही आपणांस प्रकर्षाने दिसून येत आहेत. पालक आपल्या पाल्य म्हणजे आपली स्वप्न पूर्ण करण्याचे साधन म्हणून त्याकडे पाहत आहेत. अशातच पालक आपल्या पाल्याकडे अभ्यासपूरक विषयांपेक्षा प्रत्यक्ष अभ्यासाचे विषय याकडे लक्ष देतांना दिसून येत आहेत. या शालेय व्यवस्थापनाकडून, शिक्षकांकडून ही अभ्यासपूरक तासिकांची अंमलबजावणी करताना त्या तासिका ही अभ्यासाच्या तासिका करुन घेताना दिसून येत आहेत. यामुळे मात्र विद्यार्थ्यांच्या अभ्यासपूरक तासिकेतून दिसून येणा–या विविध गुणांचा विकास पुरेसा होताना दिसून येत नाही. यामुळे आजचा बालक हा मैदानी खेळाकडे कमी ओळत आहे. तसेच फक्त नोकरी मिळविण्याच्या स्पर्धेत पळतांना दिसून येत आहे. विद्यार्थ्यांना विविध रुपात सामाजिक आंतरक्रिया करण्याची संधी मिळवून देण्याचे काम प्रशासन व शिक्षकाचे आहे म्हणून ही संधी अभ्यासपूरक तासिकांच्या माध्यमातून उपलब्ध करुन देता येते. अशा कार्यक्रमाचे आयोजन शाळेत करणे आवश्यक आहे. तसेच नगर परिषद शाळा क्र. 07, मनमाड ही शाळाही काही वेगळी नाही म्हणून संशोधकाने जाणीवपूर्वक या शाळेतील अभ्यासपूरक तासिकांच्या वस्तूस्थितीचा चिकित्सक अभ्यास करून त्यावर उपाययोजना करण्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य करण्यात आले आहे.*

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

महत्त्वाचे शब्द

अ. **नगर परिषद** – महाराष्ट्र शासनाच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील नगर परिषद ही एक शहरी भागातील

स्थानिक स्वराज्य संस्था. 25000 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरी भागात नगर परिषदेची स्थापना केली जाते.

ब. **मनमाड–** नाशिक जिल्ह्याच्या पूर्व भागातील नांदगाव या तालुक्यातील एक मोठे शहर या शहरात ब वर्ग नगर परिषदेचे हे शहर आहे. तसेच या शहराची ओळख मध्ये रेल्वेचे मोठे रेल्वे जंक्शन असलेले मनमाड शहर.

क. **अभ्यासपूरक तासिका** – विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासाबरोबरच कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण या विषयाच्या तासिका दिलेल्या असतात या विषयाच्या तासिका म्हणजे अभ्यासपूरक तासिका होय.

ड. **विद्यार्थी–** नगर परिषद शाळा क्र. 07 मनमाड येथील शाळेत शिकत असलेले मुले व मुली.

इ. **वस्तुस्थिती–** वस्तुस्थिती म्हणजे सद्यस्थितीत आहात या अर्थाने वापरलेला शब्द.

ई. **चिकित्सक अभ्यास** – यामध्ये अभ्यासपूरक तासिका संदर्भात साधकबाधक चर्चा व सूक्ष्म अभ्यास करणे होय.

उ. **उपाययोजना** – एखादी समस्या सोडविण्यासाठी अवलंबिलेला मार्ग म्हणजे उपाययोजना होय किंवा समस्या सोडविण्यासाठी सुचवलेले उपक्रमध्तरतुदी यास उपाययोजना म्हणतात.

**संशोधन लेखाचा मुख्यभाग**

शालेय जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता अभ्यासाच्या विषयासोबतच अभ्यासपूरक विषयांची ही आवश्यकता असते. कला हे माणसाला जगण्याचे बळ देते. कार्यानुभवातून आपल्या कल्पनाविष्काराला चालना मिळते. खेळातून शारीरिक क्षमता तपासून पाहिली जाते. हार पचविण्याचे धाडस निर्माण होते असे एक ना अनेक महत्व या विषयाचे आहे म्हणून हे विषय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. अभ्यासपूरक विषयांची ही प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी यामुळे त्याही विषयांना न्याय मिळण्यासाठी प्रस्तुत संशोधन करणे गरजेचे होते. आधुनिक शिक्षणाचे ध्येय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे होय. विद्यार्थ्यांचा फक्त बौध्दिक, ज्ञानात्मक विकास अपेक्षित नाही तर सर्वांगीण विकास या संकल्पनेत विद्यार्थ्यांचा नैतिक, सामाजिक, राजकिय, धार्मिक विकास अपेक्षित आहे. फक्त वर्गात अध्ययन करुन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे आवश्यक आहे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमाच्या तासिकांना जोडून अभ्यासपूरक तासिकांनाही तेवढेच महत्व आहे. म्हणजेच विविध अभ्यासपूरक तासिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा वेगवेगळया पध्दतीने विकास घडवून आणण्यास मदत होते. विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास वाढीसही या अभ्यासपूरक तासिकांची मदत होते. विविध क्रिडा स्पर्धा, वाद विवाद, स्पर्धा परीक्षा इ. मुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होत असतो. सामाजिक धौर्याची पूर्तता, सांस्कृतिक मूल्याची जोपासना केली जाते. असे अभ्यासपूरक कार्यक्रम राबविण्याच्या बाबतीत शाळेमध्ये उदासिनता जाणवते यासाठी अनेक कारणे संशोधकाच्या निदर्शनास आली. त्यामुळे आजच्या शिक्षण पध्दतीत विद्यार्थ्यांचे ज्ञानात्मक विकास करताना एकच पौलूला जास्त महत्व दिले जावू नये म्हणून प्रस्तुत विषयावर संशोधन करणे गरजेचे होते.

व्यक्तिमत्व या संज्ञेत विद्यार्थ्यांच्या बौध्दिक व ज्ञानात्मक विकासासोबतच त्यांच्या अनेकविध प्रवृत्तींचा विकास, आवडीनिवडीचा विकास, भावात्मक, नैतिक, सामाजिक विकास इत्यादी घटकांचा समावेश होतो. विविध प्रकारच्या शैक्षणिक अनुभवांची व्यवस्था करणे व त्यानुरूप कार्यक्रमांचे संयोजन करणे आवश्यक असते. हे कार्य

अभ्यासपूरक तासिकांच्या माध्यमातून होऊ शकते. अभ्यासात खूप पुढे नसलेला विद्यार्थी, जर उत्तम खेळाडू किंवा चित्रकार झाला तर बिघडले कुठे? उलट असे होण्यातच त्याच्या जीवनाची सफलता आहे, म्हणूनच अभ्यासपूरक तासिकांची वेळापत्रकात शाळेने व्यवस्था करणे आवश्यक ठरते. अभ्यासपूरक उपक्रमांच्या बाबतीत एक जुना दृष्टिकोन असा होता की, विद्यालये ही फक्त अध्ययन अध्यापनासाठी असून अशा विविध उपक्रमात वेळ घालविणे म्हणजे वेळेचा अपव्यय होय.

पण आधुनिक काळात विशेषतरू भारतात स्वातंर्त्योत्तर काळात शिक्षणाची उद्दिष्टे व्यापक झाली असून त्यात व्यक्तीचा बौध्दिक नव्हे तर सर्वांगीण विकास तितकाच महत्वाचा मानला गेला आहे. म्हणून अशा अभ्यासपूरक तासिकांना उपक्रम राबविण्यासाठी अनन्यसाधारण असे महत्व प्राप्त झाले आहे. प्रस्तुत संशोधनात अभ्यासपूरक तासिकांच्या कार्यवाहीचे स्वरूप व पध्दती समजण्यास मदत झाली. उपक्रम राबविण्याची पध्दत समजल्यामुळे विशिष्ट उपक्रमांसंदर्भात वेगळेपण लक्षात येण्यास मदत झाली.

शालेय शिक्षणाच्या बाबतीत सद्यस्थितीचा विचार केल्यास शिक्षण हेच विद्यार्थ्यांचे संरक्षण कवच आहे. शाळेत अभ्यासक्रम व अभ्यासपूरक सहशालेय उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची वाढ व विकासास मदत होते. अभ्यासपूरक तासिकांचे नियोजन शिक्षकांना करावे लागते.

नियोजन करतांना अभ्यासपूरक कार्यक्रमांचे वर्षभरात वर्गीकरण वेगवेगळया प्रकारे केले जाते. शौक्षणिक विषयांत अभ्यासपूरक कार्यक्रम मोठया प्रमाणात शोधता येतात. विशिष्ट संस्कार विद्यार्थ्यांपर्यंत कसा पोहोचवावा म्हणून प्रस्तुत संशोधन करणे महत्वाचे होते. विद्यार्थ्यांमध्ये विविध कल्पना, क्लृप्त्या इ. मार्ग दिसून येण्यासाठी त्याच उद्देशाने उद्दिष्टानुसार विविध अभ्यासपूरक कार्यक्रमांची उभारणी करुन त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष अनुभव मिळवून देण्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य महत्वाचे आहे. आजकाल बालक हे पालकांच्या इच्छापूर्तीचे साधन आहे.

तसेच त्याचा वापर करून घेतांना दिसून येत आहे. आजचे विद्यार्थी स्वच्छतेचे, वृक्षसंगोपन, वृक्षलागवड, मौदानी खेळाचे महत्व, खेळातून यश अपयश पचविणे, सहकार्य भावना, चिकाटी, धौर्य, अचुकता असे गुण हे अभ्यासपूरक तासिकांचा प्रभावी अंमलबजावणी यातूनच विद्यार्थ्यांमध्ये विकसित होतात. अभ्यासपूरक कार्यक्रमातून वक्तशीरपणा, नीटनेटकापणा, सहकार्यभावना अशी मूल्ये त्यांच्या रूजविण्यासाठी प्रस्तुत संशोधन करणे महत्वाचे होते. अभ्यासपूरक तासिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या वर्तनात परिवर्तन सहज व त्वरेने घडून आले.

**संदर्भ ग्रंथ**

1 बापट भा. गो. (1988) शौक्षणिक संशोधन, तिसरी आवृत्ती, नूतन प्रकाशन– पुणे.
2 भिंताडे वि. रा. (1994) शौक्षणिक संशोधन पध्दती, प्रतिरुप आवृत्ती, नूतन प्रकाश, पुणे.
3 देशपांडे प्रकाश आणि पाटोळे एन. के. (1994) संशोधन पध्दती, य.च.मु.वि. नाशिक.
3 मुळे रा. रा. आणि उमाठे वि. तू. (1998) शौक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, तिसरी आवृत्ती, विद्या प्रकाश, औरंगाबाद.
4 तांबे चं. तु. (2010), शिक्षण तरंग, वर्ष दुसरे, अंक 7 वा, इनसाईट प्रकाशन, नाशिक.
5 प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, 2004 (2010) महाराष्ट्र राज्य शौक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, पुणे.

**Websites :**

1. www.wikipedia.org
2. www.unipunejayakarlab.com
3. www.maharashtra.gov.in.
4. www.shodhganga.com
5. http://www.hbcse.tifr.res.in/research-development/ph.d.-theses.